महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

**सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा, नागपुर विभाग यांचे कार्यालय,**

लेखाकोष भवन तिसरा माळा, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, सिव्हील लाईन्स्, नागपुर.

☎-०७१२-२५६०१२४ Email- jd.nagpur@mahalfa.in

क्र.१८/ब/जि.प./entry conf/भंडारा/नाग- 346 दिनांक 14/03/2023

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परीषद,
भंडारा.

विषय : **<u>दिनांक ०१/०३/२०२३ रोजी जिल्हा परीषद भंडारा येथे लेखापरीक्षण सुरु करण्यापुर्वी झालेल्या entry conference चे इतिवृत्त प्रसिद्ध करणेबाबत.</u>**

संदर्भ : मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग, म. रा. मुंबई यांनी दि. ०२/०२/२०२३ रोजीच्या आढावा बैठकीत दिलेले निर्देश

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडून जिल्हा परीषद भंडाराचे सन २०२१-२२ **लेखापरीक्षण सुरु करणेपुर्वी दिनांक ०१/०३/२०२३ रोजी entry conference** आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

| अ. क्र. | अधिका-याचे नाव | पदनाम | विभागाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री बोन्द्रे | मुख्य कार्यकारी अधिकारी (प्र) | जि.प. भंडारा. |
| २ | श्रीमती मोना कृ ठाकुर | सहसंचालक | स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर. |
| ३ | श्री सुनील सोनी | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | जि.प. भंडारा. |
| ४ | श्रीमती सीमा नान्होरे | सहायक संचालक | स्थानिक निधी लेखापरीक्षा, भंडारा. |
| ५ | श्री नामदेव हेडाऊ, | जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, | स्थानिक निधी लेखापरीक्षा, भंडारा. |
| ६ | श्री समीर श देशमुख | सहायक लेखापरिक्षा अधिकारी, | स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर. |
| ७ | श्री म य मांढरे | वरीष्ठ लेखापरीक्षक | स्थानिक निधी लेखापरीक्षा, भंडारा. |
| ८ | डॉ. मिलिंद सोमकुंवर | जिल्हा आरोग्य अधिकारी, | जि. प. भंडारा |
| ९ | श्री. एस. आर. मदनकर | लेखा अधिकारी, | जि. प. भंडारा |
| १० | श्री. विजय म. ठक्कर | सहाय्यक लेखा अधिकारी, | जि. प. भंडारा |
| ११ | श्री. एम. बी. लांडे | उपशिक्षणाधिकारी (प्राथ.), | जि. प. भंडारा |
| १२ | श्री. पी. ए. देशमुख | सहाय्यक लेखा अधिकारी, | ग्रा. पा. पु. विभाग, जि. प. भंडारा |
| १३ | श्री. एस. व्ही. चव्हाण | सहाय्यक लेखा अधिकारी, | लघु पाटबंधारे विभाग, जि. प. भंडारा |
| १४ | श्री. पी, एफ. नागपूरे | | लघु पाटबंधारे विभाग, जि. प. भंडारा |
| १५ | श्री. यु. पी. खालसे | | महिला व बालकल्याण विभाग, जि. प. भंडारा |
| १६ | श्री एस ए बनकर | क प्र. अ. | पाणी व स्वच्छता विभाग, जि.प. भंडारा |
| १७ | श्री ए बी धर्मे | स.का. अ. | नरेगा, भंडारा |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | श्री. म. य. मांढरे | वरिष्ठ लेखापरीक्षक, | स्थानिक निधी लेखापरीक्षा, म. राज्य भंडारा |
| १९ | श्री. सं. प्र. साधनकर | वरिष्ठ लेखापरीक्षक, | |
| २० | श्री. मि. प्र. अनवाने | वरिष्ठ लेखापरीक्षक, | |
| २१ | श्री. रा. वा. दुर्गे | वरिष्ठ लेखापरीक्षक, | |
| २२ | श्री. सं. व. रामेरवार | कनिष्ठ लेखापरीक्षक, | |
| २३ | श्रीमती आ. म. काटोले | कनिष्ठ लेखापरीक्षक, | |
| २४ | श्री. मो. ल. सहारे | कनिष्ठ लेखापरीक्षक, | |
| २५ | श्रीमती चि. छ. भोयर | कनिष्ठ लेखापरीक्षक, | |
| २६ | श्रीमती अ. ला. श्रीरंग | कनिष्ठ लेखापरीक्षक, | |
| २७ | श्रीमती ह. दि. भागवतकर | कनिष्ठ लेखापरीक्षक, | |
| २८ | श्रीकृष्ण फिरके | लेखापरीक्षा लिपिक, | |

मा. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर विभाग, नागपूर यांनी, १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीने मा. महालेखाकार कार्यालयाने टीजीएस प्रशिक्षणांतर्गत दिलेल्या निर्देशांनुसार कुठल्याही संस्थेचे लेखापरीक्षण सुरु करण्यापुर्वी त्या संस्थेच्या विभाग प्रमुख यांचेशी entry conference घेऊन त्यांना **लेखापरीक्षण दरम्यान लेखापरीक्षण विभाग काय तपासणी करणार आहेत, त्यांचे focus points काय राहतील, परीच्छेदांची संख्या कमी होण्याचे दृष्टीने एकत्रित काय उपाययोजना असु शकतील, तसेच चालू लेखापरीक्षणा दरम्यान परीच्छेदांची संख्या कमी होण्याकरीता विभागाकडून कोणत्या प्रकारची कार्यवाही अपेक्षित आहे** याची सखोल चर्चा एकत्रितपणे घडवून आणणे करीता या **entry conference ची आवश्यकता** समजावून सांगितली.

त्यानुषंगाने पुढे लेखापरीक्षण विभागास जिल्हा परीषद विभागाचे लेखापरीक्षण दरम्यान ब-याच अडचणींचा सामना करावा लागतो. उदा. **त्याच त्याच परीच्छेदांचा वारंवार उल्लेख होतो, विभागाकडून अभिलेखे उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत. प्रलंबित महत्वाचे परीच्छेदांचे PRC / PAC प्रारुप परीच्छेदांत रुपांतर होणे. त्यानुसार त्याच्या निपटारा प्रकरणी होणारा त्रास.** तसेच समन्वयाचा अभाव या सर्व गोष्टींचा विचार करता **लेखापरीक्षकांची भुमिका ही केवळ विभागाच्या चुका काढणे हा उद्देश नसुन मित्र, तत्वज्ञ व मार्गदर्शक अशी असल्याने अनवधानाने, अज्ञानाने ज्या चूका झालेल्या आहेत त्यात सुधारणा सुचविणे, परीच्छेदांची संख्या कमी करणे, अहवालाचा स्तर उंचावणे असे आहेत.** तसेच PRC / PAC दरम्यान **मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष, परीच्छेदांचे अनुपालन पुर्ण नसल्याने त्याचे वर्गीकरण त्यामुळे होणारा त्रास** इत्यादिचा विचार करुन **लेखापरीक्षण दरम्यानच उक्त परीच्छेदांबाबत चर्चा करणे सुलभ होण्याचे दृष्टीने कार्यवाही करणे सुलभ होते.** जिल्हा परीषदेचे लेखापरीक्षण विहीत वेळेत व नियोजनानुसार होणे करीता प्रस्तावित वेळापत्रक सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, भंडारा यांनी निर्गमीत करण्यात यावे जेणेकरुन विभाग प्रमुखास लेखापरीक्षणाची तयारी करणे सुलभ होईल.

**मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर याचे परीपत्रक क्र. विशा/कार्या-१२(२)/कावि-१८ दि. १३/०२/२०१९** नुसार लेखापरीक्षक पथक व लेखापरीक्षण करण्यात येत असलेला जिल्हा परीषदेचा विभाग यामध्ये समन्वय राहुन लेखापरीक्षण पथकास लेखापरीक्षणास आवश्यक माहिती विहीत वेळेत प्राप्त होणेकरीता विभागातील **अनुभवी व जाणकार कर्मचा-याची नोडल अधिकारी** म्हणून नेमणूक करण्यात यावी. याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावरुन समन्वय साधून विभाग प्रमुखांनी त्याबाबत आढावा घेउन मदत करणे योग्य होईल, जेणेकरुन अर्धसमास पत्राचे आदान-प्रदान, त्यावर विहीत वेळेत करावयाची कार्यवाही, त्यानुषंगाने **अनुपालन सादर करणे याचा ताळमेळ घेणे सुलभ होईल व अर्धसमास पत्राचे विहीत वेळेत परीपूर्ण अनुपालन सादर झाल्याने परीच्छेदांची संख्या कमी होण्यास मदत होईल. तसेच, अर्धसमास पत्राचे अनुपालन अर्धवट, अनुषंगिक अभिलेखे संलग्न न करता सादर करण्याचे प्रमाण**

**कमी होईल व परीपूर्ण अनुपालने प्राप्त होऊन त्यावर कार्यवाही करणे लेखापरीक्षण विभागास सुलभ होईल.** तसेच अभिलेखे वेळेवर उपलब्ध न करुन दिल्याने स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ मधील तरतूदी नुसार दंडात्मक कार्यवाहीच्या प्रस्तावाची वेळीच दखल घेतल्या जाईल व प्रकरणांची संख्या कमी होण्यास मदत होईल. मुळातच अभिलेखे न दाखविणे ही एक गंभीर अनियमितता आहे. त्यामुळे उक्त अभिलेख्यात अपहार, गंभीर वित्तीय अनियमितता असण्याची शक्यता असल्याचा लेखापरीक्षकाचा दृष्टीकोन होऊ शकतो. तसेच, सदर अभिलेखे न तपासल्यामुळे त्यात पुढे सुधारणा होत नाहीत व परीणामी, उक्त बाब **PRC / PAC** च्या स्तरावर जाऊ नये हा उद्देश आहे. सदर **जबाबदारी ही नोडल अधिकारी व संबंधित विभाग प्रमुख** यांची आहे.

अर्धसमास पत्र पुढील प्रमाणे मुद्द्यांनुसार निर्गमीत करण्यात येते. मानकानुसार झालेला खर्च, अपूरे बांधकाम, प्राप्त व खर्च अनुदान, खरेदीचा खर्च इत्यादी. प्रत्येक अर्धसमास पत्रावर विभाग प्रमुख या नात्याने स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. दिवस अखेर अर्धसमास पत्राच्या नोंदवहीवर स्वाक्षरी घेणे व त्याचा आढावा घेऊन स्थानिक निधी लेखापरीक्षा १९३० मधील नियमानुसार ०३ दिवसांचे आत किंवा लेखापरीक्षण पुर्ण होण्याचे आत त्याचे अनुषंगिक अभिलेख्यासह परीपूर्ण अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

मा. संचालक, संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, म. रा. मुंबई यांचे आदेशानुसार कुठल्याही संस्थेचे **लेखापरीक्षण पुर्ण होऊन त्या संस्थेच्या बाहेर पडण्यापुर्वी लेखापरीक्षण दरम्यान आढळून आलेल्या उणिवा, त्रटी , अनियमिततेबाबत प्रारुप अहवाल तयार करुन त्यावर चर्चा करणे आवश्यक आहे. सदर प्रारुप अहवालावर चर्चेदरम्यान सुद्धा परीपूर्णअनुपालन सादर केल्यास परीच्छेदांची संख्या कमी होण्यास मदत होईल.** विभाग प्रमुख अर्धसमास पत्राच्या अनुपालनाप्रती सजग राहील्यास केवळ गंभीर परीच्छेद **PRC / PAC** च्या स्तरापर्यंत जातील. तसेच, प्रलंबित परीच्छेदांचा निपटारा करण्यास त्रास होणार नाही., जुने परीच्छेद निकाली काढणे हे कधी कधी त्रासदायक काम होण्याची शक्यता आहे. कारण पुढील प्रमाणे आहेत. उदा. **संबंधित परिच्छेदांचे वेळी असलेले तत्कालीन वेळेस सेवेत असणारे अधिकारी/कर्मचारी हे सेवानिवृत्त झालेले असणे, अभिलेखे उपलब्ध नसणे, अर्धसमास पत्राचे परीपुर्ण अनुपालन सादर केलेले नसणे, त्यावर चर्चा झालेली नसणे, तसेच ०४ महिन्याच्या विहीत मुदतीत अनुपालन सादर केलेले नसणे** इत्यादि.

प्रारुप अहवालाचे **अंतिमीकरण अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थितीत संबंधित विभागाचे विभागप्रमुख** यांचे सोबत करावयाचे आहे. त्यामुळे **प्रारुप अहवालावर विस्तृत चर्चा होऊन परिच्छेदांची सख्या कमी करता येणे शक्य होईल.** यावर्षीच्या लेखापरीक्षण दरम्यान **उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( सामान्य प्रशासन विभाग) व उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत विभाग) यांचे स्वतंत्र लेखापरीक्षण करण्यात येणार आहे.** १५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीचे पंचायत समिती व ग्राम पंचायत स्तरावर केलेल्या लेखापरीक्षणादरम्यान आढळून आलेल्या सामान्य अनियमितताबाबत गोषवा-याचे पत्र सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नागपूर विभाग, नागपूर यांचे स्तरावरुन निर्गमित केल्या जाईल. पंचायत समितीस प्राप्त १५ व्या वित्त आयोगाच्या १०% निधीबाबत संनियंत्रण, त्यानुसार झालेला खर्च इत्यादिबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत विभाग) यांचे संनियंत्रण, त्यांचे job chart नुसार असलेल्या बाबी, विकासात्मक तसेच आस्थापना विषयक बाबींचे लेखापरीक्षण करण्यात येऊन त्याचा अहवाल स्वतंत्र निर्गमित करण्यात येईल. त्याच बरोबर आमचा गाव आमचा विकास बाबतच्या अभिलेख्यानुसार पंचायत विभागास आढळून आलेल्या अफरातफर प्रकरणी लेखापरीक्षण केल्या जाईल.

**शिक्षण विभागात GeM portal, E-tendaring द्वारे करण्यात आलेल्या खरेदीचे अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करुन दिल्यास अर्धसमास पत्र निर्गमित करणे, अनुपालन घेणे यात वेळेचा अपव्यय होणार नाही. समाज कल्याण विभागाद्वारे देण्यात येणा-या सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती चे अभिलेखे लेखापरीक्षणा दरम्याने वेळेत उपलब्ध करुन दिल्यास लेखापरीक्षण विहीत वेळेत पुर्ण करणे शक्य होईल व दंडात्मक कार्यवाही टाळणे शक्य होईल.** प्रलंबित परीच्छेदांचे अनुपालन

लेखापरीक्षण दरम्यान सादर केल्यास त्याची योजनानिहाय तपासणी करुन योग्य अनुपालन अनुषंगिक अभिलेख्यासह असल्यास वगळण्यात येईल.

**<u>सामान्य प्रशासन विभाग</u>**

(१) सामान्य प्रशासन विभागाचे लेखापरीक्षण करीत असतांना स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाचे नियंत्रण व focus area काय असेल याचे विवेचन करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने बांधकाम विभागाचे लेखापरीक्षण करतांना प्रशासकीय, योजनानिहाय, १५ वे वित्त आयोगाच्या निधीचा खर्च, व प्रत्यक्ष लाभार्थी निवड व प्रदान प्रक्रीयेबाबतीत लेखापरीक्षण करण्यात येईल असे स्पष्ट केले.

(२) जिल्हा परीषदेकडे **स्वत:चे मत्ता किती आहेत याचे एकत्रित नोंदवही नाही. त्याकरीता त्यांचे इस्टेट नाही. बिल्डींग, रोड इत्यादिचे एकसुत्री अभिलेखे नाहीत. सदर आक्षेप लेखापरीक्षण विभागाकडून नियमितपणे घेतल्या जातो. तसेच उक्त मत्तेवर घसारा गणना करुन वार्षिक लेख्यात (चल/अचल संपत्तीबाबत) त्याची नोंद करण्यात येत नाही. सदर वार्षिक लेखे प्रमाणित करावयाचे असल्याने सदर मुद्दा हा जिल्हा परीषदेच्या कोणत्या विभागाने बघावयाचा यात स्पष्टता नाही. अंदाजपत्रकात घसारा निधीची मागणी केल्या जात नाही. द्विनोंद पद्धतीमध्ये नोंद करावयाची झाल्यास यात अडचणी वाढण्याची शक्यता आहे. तसेच, बांधकाम विभाग, पंचायत विभाग, पाणी पुरवठा विभाग हे सर्व बांधकामे करतात. परंतु, त्याचे geo tagging केल्या जात नाही. परीणामी जिल्हा परीषदेची एकत्रित मत्ता निश्चित करणे अडचणीचे ठरते. १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ईस्टेट विभाग असणे व त्यानुसार कार्यवाही करणे योग्य आहे. सदर बाब ही धोरणात्मक असल्याने शासनाचे निर्देशांनुसार कार्यवाही करण्यात यावी.**

**<u>बांधकाम विभाग</u>**

सदर विभागात **नियमीतपणे आढळून येणा-या आक्षेपामध्ये** मागिल अनियमिततेमध्ये कपात न केलेल्या वैधानिक कपातीबाबत, GST यंत्रणेबाबत, त्याचे परतावे, वेळेवर कार्यवाही न करणे बाबतचे आहेत. **बांधकाम विभागाच्या उपविभागाचे अभिलेखे, निविदा प्रक्रीयेचे अभिलेखे, निवीदा बी-१ च्या अटी व शर्ती, बांधकामावर नेहमीचे आक्षेप, Royalty clearance certificate, हे लेखापरीक्षणाचे केंद्रीत मुद्दे (focus points)** आहेत. सदर **प्रमाणपत्र हे जिल्हाधिकारी कार्यालय सादर करीत नाहीत** असे चर्चे दरम्यान सादर करण्यात आले. **कमी व जास्त टक्केवारीने दिलेल्या कंत्राटाच्या बाबतीत performance security deposit बाबत काय कार्यवाही केली. नियमीतपणे कृती आराखडा, नोंदवह्या सादर केल्या जात नाही. देखभाल दुरुस्ती , घसाराची स्थिती याचे लेखापरीक्षण केल्या जाईल. नवीन बांधकामे, नवीन रस्ते, इतर विभागाकडून हस्तांतरीत कामे याबाबतचे संपुर्ण अभिलेखे उपलब्ध** करुन देण्यात यावेत.

**मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, म. रा. मुंबई तसेच, मा. महालेखापाल यांचे निर्देशांनुसार जि.प. बांधकाम, लघुपाटबंधारे विभागांने केलेल्या बांधकामाच्या निवडक स्थळी (उदा. PHC, शाळा, मोठे प्रकल्प इत्यादी. ) प्रत्यक्ष भेट देण्यात येणार असुन त्याकरीता विभागातील अनुभवी अभियंता मोजमाप पुस्तिका व इतर अनुषंगिक अभिलेख्यांसह** सहकार्य करण्याविषयी सूचविण्यात आले. सदर बाबतीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी अभिलेखे उपलब्ध करुन देणेबाबत आश्वस्त केले.

इतर विभागांबाबत executive summery नुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. भंडारा यांना सादर केल्या जाते. त्यानुसार जिल्हा परीषदेच्या मासिक सभेत यावर वाचन करुन चर्चा होणे, त्यातील ठळम मुद्यांची दखल घेऊन ते अनुपालनासह अनुषंगिक अभिलेखे संलग्न करुन निकाली काढण्याच्या उद्देशाने कार्यवाही होणे

आवश्यक आहे. उक्त नुसार कार्यवाही पुर्ण झाल्यास परीच्छेद निकाली काढणे स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागास सुलभ होते. त्याकरीता उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. व सहायक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचा समन्वय असणे योग्य आहे.

**<u>आरोग्य विभाग</u>**

सदर विभागाचे लेखापरीक्षण करीत असतांना स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाचे नियंत्रण व focus area प्रामुख्याने आषध खरेदी करीत असतांना नियमांचे पालन केले किंवा कसे? PHC मध्ये उपलब्ध साठा, प्रणालीद्वारे मागणी , पुरवठा आदेश तसेच खरेदी याचा ताळमेळ घेतला जात नाही. PHC इमारतींच्या बांधकामाची कामे अपूर्ण असणेबाबत, वैद्यकीय प्रतिपूर्ति शुल्काबाबत, अग्रीमाची वसूली ईत्यादिबाबत लेखापरीक्षण दरम्यान अभिलेखे तपासले जातील.

**<u>वित्त विभाग</u>**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक एयुडी-२००७/प्र.क्र. २७४३/वित्त-८ दिनांक २०/१२/२०१० नुसार अंतर्गत लेखापरीक्षण करीता एकत्र समिती तयार करुन त्याची व्याप्ती पंचायत समिती व ग्राम पंचायत स्तरापर्यंत नियमीतपणे करणे** आवश्यक आहे. **अंतर्गत लेखापरीक्षणाचा नियमितपणे आढावा** घेण्यात यावा. **नियमीतपणे बँकेशी ताळमेळ** घेण्यात यावा. खात्यात शिल्लक असलेल्या **प्रलंबित निधीबाबत काय कार्यवाही केली** आहे याची माहीती नियमीतपणे घेण्यात यावी. **वित्तप्रेषण, खाते, वेतन, विविध योजनानांचा अखर्चित निधी याची पडताळणी लेखापरीक्षण** दरम्यान करण्यात येईल. याकरीता पुरेसे मनुष्यबळ नसल्याचे विभागाकडून सादर करण्यात आले. त्यानुषंगाने याबाबत काही प्रमाणात कार्यवाही करावयाच्या दृष्टीने **त्रैमासिक नियोजन करुन पंचायत समितीचे अंतर्गत लेखापरीक्षण** करण्यात यावे तसेच सदर बाबतीत **पंचायत समितीच्या ज्या विभागाचे अंतर्गत लेखापरीक्षण करावयाचे आहे जिल्हा परीषदेच्या त्या विभागातील मनुष्यबळ लेखापरीक्षणास वापरण्यात यावे** असे ठरले.

अंतर्गत **निधी व्यवस्थापनाची स्थिती योग्यरित्या कार्यान्वयीत नसल्याचे** यावेळी सांगण्यात आले. **१३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीमध्ये नमूद केल्याप्रमाणे PriyaSoft ही संगणकीय प्रणाली** सर्व स्तरावर लागू करून त्यानुसार सर्व प्रदाने करण्याचे निर्देश आहेत. त्याकरीता कंत्राटी कर्मचा-यांकडून डॅटा एंन्ट्री करुन लेखा सुरळीत होणे अपेक्षित होते. परंतु **सद्यस्थितीत सदर प्रणाली कार्यान्वयीत नसल्याचे** विभागाकडून सादर करण्यात आले. तसेच, **विविध विभागस्तरावरुन त्यांचे स्वत:ची यंत्रणाचे व्यवस्थापन होत असल्याचे** देखील सादर करण्यात आले. **मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे स्तरावरुन त्याचा ताळमेळ घेतल्या जात नाही.** याकरीता **BEAMS या राज्य शासनाच्या संगणकीय प्रणाली सारखी IFMS ही प्रणाली असणे गरजेचे आहे असे वित्त विभागाकडून सुचविण्यात आले. तसेच, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची भुमिका व त्याचे स्वरूप निश्चित होणे आवश्यक आहे असे त्यांचेकडून सुचविण्यात आले.**

**कोषागार निवृत्ती वेतन प्रदान प्रणालीनुसार वित्त विभाग व पंचायत समिती स्तरावरुन प्रदान होणा-या निवृत्तीवेतन प्रदान प्रणाली विकसीत व त्यानुसार वित्तप्रेषण व कमी अधिक अनुदान मागणीवर नियंत्रण असणे आवश्यक आहे असे वित्त विभागाकडून सुचविण्यात आले.**

**अखर्चित निधी शासनास जमा करणेकरीता स.ले. अ. च्या मासिक बैठकीत तसेच, नियमितपणे त्रैमासिक आढावा घेऊन व विशेष मोहीम राबविणे आवश्यक आहे.**

## लघु पाटबंधारे विभाग

सदर विभागाचे लेखापरीक्षण करीत असतांना प्रकल्प **निहाय त्याची फलनिष्पत्ती, द्विरुक्ती, त्याचे focus areas यावर** विशेष लक्ष देऊन त्यानुसार लेखापरीक्षण करण्यात येईल असे सांगण्यात आले.

## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

सदर विभागाचे लेखापरीक्षण करीत असतांना **पाणी टंचाई बाबत केलेली कार्यवाही, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) च्या कार्यवाहीचे अभिलेखे त्याचे विवरणानुसार माहिती उपलब्ध करुन दिल्यास लेखापरीक्षण** करणे सुलभ हॊईल. तसेच सदर लेखापरीक्षण दरम्यान येणा-या अडचणींचे निराकारण चर्चेदरम्यान करण्यात येईल. काही शासन निर्णय निरस्त करुन नवीन निर्णय निर्गमीत केले जातात त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत अनुपालन सादर केल्यास त्याची दखल घेऊन परीच्छेद निकाली काढणे सुलभ होईल.

तसेच **एकच परीच्छेदात अनेक विभागांचे मुद्दे असतात. त्याचे अनुपालन सादर करणे अडचणीचे ठरते असे विभागाकडून सादर करण्यात आले त्यानुसार एका मुळ कामावर एकच एकत्रित मुद्दा घेण्यात यावा, असे महालेखाकार कार्यालयाचे निर्देश असल्याने त्यानुसार कार्यवाही केली जाईल** असे स्पष्ट सांगण्यात आले.

लेखापरीक्षण कार्यालयीन नियमपुस्तिका नुसार तीन प्रकारे केल्या जातात.

१) **योजनानिहाय** – योजनेत नमूद केलेल्या अटी व शर्तींची पुर्तता केली आहे किंवा कसे? यावर अभिप्राय देण्यात येतात.

२) **परफॉर्मन्स** – योजनेस ज्या उद्दिष्टाकरीता मंजूरी प्राप्त झालेली आहे त्याची फलनिष्पत्ती झालेली आहे किंवा कसे? यावर अभिप्राय देण्यात येतात.

३) **वित्तीय** – सदर योजनेचे प्रदान कशा प्रकारे केल्या गेलेले आहे. त्यावर अभिप्राय देण्यात येते.

## प्रलंबित परिच्छेदांचे बाबत

प्रलंबित परिच्छेदांचे विभागाकडून वाचन होत नसल्याने त्यांचे object memo काय आहे ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रथम अनुपालन सादर केल्या जात नाही. परीणामी लेखापरीक्षणाचे उद्दिष्ट सफल होत नाही.

जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायतीचे सन १९६२ पासून मोठया प्रमाणात परिच्छेद प्रलंबित आहेत. त्यांचा निपटारा होण्याकरीता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेस्तरावरुन कार्यवाही होणे अपेक्षित आहे. पंरास अंतर्भुत असलेले परिच्छेद व पंरास मध्ये अंतर्भुत नसलेले परिच्छेदांची संख्या खालीलप्रमाणे -

**माहे डिसेंबर**-२०२२ अखेर

| अ. क्र. | संस्थेचे नाव | पंरास अंतर्भुत असलेले परिच्छेद | पंरास अंतर्भुत नसलेले परिच्छेद | एकूण परिच्छेद | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद | १५०७ | ८०७२ | ३ | |
| २ | पंचायत समिती | ४२५ | २३३७ | २७६२ | |

एखाद्या प्रकरणी नियमांचा भंग झाला असे अभिप्राय दर्शवून परीच्छेद अंतिम केला असल्यास विभागाने ज्या नियमाचा आधार घेतला असेल त्याबाबत अभिप्राय अवाजवी होत असल्यास तत्काळ लेखापरीक्षण पथकास अवगत करुन देण्यात यावे असे सांगण्यात आले. विभाग प्रमुख व पथक प्रमुख यांचे चर्चेदरम्यान उक्त मुद्दयांचे निराकारण करणे सुलभ होईल. अर्धसमास पत्राकडे दुर्लक्ष न झाल्यास परिच्छेदांची संख्या कमी होईल.

यासोबतच जुने परिच्छेद खालीलप्रमाणे वर्गीकरण करुन निकाली काढणेकरीता कार्यवाही करणे योग्य राहील असे स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडून सुचविण्यात आले.

१) पुनरावृत्ती झालेले परीच्छेद २) अभिलेखे उपलब्ध न होणेबाबत.

३) गुंतलेल्या रकमेचे ४) परिच्छेद राईट आफ करणारे

५) अभिलेख नष्ट झाल्यास पंचनामा झाला असल्यास

**<u>लेखापरीक्षणाचे विहीत वेळापत्रकाबाबत</u>**

मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परीषद लेखापरीक्षणाचे वेळापत्रक असणेबाबत त्यानुसार त्याचे पालन करणे गरजेचे असलेबाबत सादर केले. त्यानुषंगाने स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ मधील तरतूदीनुसार प्रत्येक स्थानिक स्वराज संस्थेच्या लेखापरीक्षणाचे विहीत केलेले वेळापत्रक असुन त्यानुसार वार्षिक नियोजन करुन लेखापरीक्षक केले जात असल्याचे सांगण्यात आले.

स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाकडून स्थानिक स्वराज संस्थेचे प्रत्येक स्तरावरील (जि.प./न.प./पं.स./ग्रा.प.) **विभागाकरीता स्वतंत्र मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्यात येत असुन** ती लवकरच निर्गमीत केल्या जाईल. तसेच, या **विभागाची ई-लायब्ररी तयार करण्यात येत असुन** त्याद्वारे सुद्धा अद्यावत शासन निर्णय, परिपत्रके विभागास उपलब्ध होतील असे सांगण्यात आले. त्यानुसार **स्थानिक निधी लेखापरीक्षण विभागाची स्वतंत्र MAINS प्रणाली आहे.**

. **या व्यतिरिक्त बैठकीत वेळेवर उपस्थित झालेल्या मुद्दयांचे अनुषंगाने खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.**

१) बांधकाम विभागाच्या सन २०२१-२२ या वित्तीर्य वर्षाच्या लेखापरीक्षणाची गुणवत्ता व दर्जा टिकवून ठेवणेसाठी पूर्वतयारी म्हणून अर्धसमास ज्ञापन क्र. १ ते १० च्या अनुपालनाव्दारे पूर्ण अपूर्ण कामांची यादी जिल्हा परिषद भंडारा यांचेकडून प्राप्त झाली असून प्राप्त यादीनुसार जिल्हा परिष्द भंडारा बांधकाम विभागाने सन २०२१-२२ या वर्षात १६ लेखाशिर्षाखाली एकूण ३६१ कामे पूर्ण केल्याचे दिसून येते. लेखापरीक्षणाच्या सुलभतेसाठी सदर ३६१ कामांचे कामावर झालेल्या खर्चानुसार १) १ लाखापर्यंत, २) १ ते ५ लाखापर्यंत, ३) ५ ते १० लाखापर्यंत, ४) १० ते १५ लाखापर्यंत व ५) १५ लाखाचे वरील कामे असे ५ टप्प्यांत वर्गीकरण करण्यात आले आहे. ५०५४ या लेखाशिर्षामध्ये एकूण ३८ कामे असून त्यातील १२ कामावरील खर्च हा १५ लाखावरील आहे. तसेच त्यातील जास्तीत जास्त बांधकामे ३० लाखांपर्यंत मर्यादित ठेवल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यातील ३१ कामांची लेखापरीक्षणाच्या वेळी काटकोरपणे तपासणी करण्यात येईल. एकूण ३६१ कामांपैकी २४ बांधकामे १५ लाखाच्या वरील असून सदर कामांचे लेखापरीक्षण स्वत: सहाय्यक संचालक यांचेव्दारे करण्यात येणार असल्याबाबत बैठकीत माहिती देण्यात आली

बांधकामांच्या देयकातील वैधानिक कपाती जसे आयकर, वस्तू व सेवा कर, गौण खनिज, रॉयल्टी, जिल्हा गौण खनिज प्रतिष्ठान अंशदान, कामाचा व कामगारांचा विमा, कामगार कल्याण उपकर, सुरक्षा ठेव, सेवा शुल्क, दंड यासारख्या विविध वैधानिक कपाती करणे तसेच त्या संबंधित विभागात विहीत मुदतीत भरणा करणे आणि मोजमापपुस्तिकेत नोंदी घेणे इत्यादी बाबत मा. सहसंचालक व सहाय्यक संचालक यांनी सूचना दिल्या.

बांधकाम विभागा अंतर्गत सर्व कामांना युनिफाईड कोड देणेबाबत बैठकीदरम्यान चर्चा करण्यात आली. तसेच अपूर्ण कामांची संख्या वाढत असून विभागाकडे किती कामे अपूर्ण अवस्थेत आहेत व त्यामध्ये शासनाचा किती निधी गुंतून पडला आहे? याबाबत लेखापरीक्षणास माहिती सादर करणे विषयी मा. सहसंचालक यांनी निर्देश दिले.

२) पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण - पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील जनतेला शुध्द व सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे व जलजन्य रोगांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवणे हा आहे. ग्रामीण भागात पाणी दुषित होऊ नये म्हणून करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना व पाण्याची गुणवत्ता व संनियंत्राणाची जबाबदारी याविषयी मागदर्शक सूचना उक्त परिपत्रकात नमूद केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद भंडाराने संबंधित विषयाबाबत कोणतेही अभिलेखे व दस्ताऐवज मागणी करूनही सन २०१९-२० तसेच २०२०-२०२१ च्या लेखापरीक्षणास सादर केले नाही.

मागील दोन-तीन वर्षीच्या लेखापरीक्षण अहवालात सदर प्रकरणी आक्षेप असूनही जिल्हा परिषद स्तरावरून पाणी गुणवत्ता व संनियंत्रण याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसलेबाबत मा. सहसंचालक यांनी माहिती दिली व त्यासंबंधी कार्यवाही करणेबाबत सूचना केल्या.

टंचाई आराखडा अंतर्गत खरेदी व साठा यात तफावत असल्याचे मागील लेखापरीक्षणा दरम्यान निदर्शनास आल्याचे सहाय्यक संचालक यांनी सांगितले व सदर प्रकरणी उचित कार्यवाही करणेबाबत सूचना दिल्या.

ग्रामीण पाणी पुरवठा विभागा अंतर्गत कामांचे त्रयस्थ मुल्यमापन होत नाही आणि शासन नियमांचे पालन होत नाही याबाबत सहाय्यक संचालक यांनी सर्वांना माहिती दिली व त्या संदर्भाने कार्यवाही करणेबाबत सूचना दिल्या.

३) धडकसिंचन व जलयुक्त शिवाराच्या कृती आराखड्याबाहेर कामे झालेली असलयाचे मागील लेखापरीक्षणास दिसून आल्याची माहिती सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, भंडारा यांनी दिली व लघुपाटबंधारे विभागाच्या पथकप्रमुखांशी सदर प्रकरणी चर्चा केली.

४) घसारा निधी - शासन नियमांप्रमाणे प्रत्येक वर्षी निश्चित केलेल्या दराने इमारती, मालमत्ता, वाहन, साहित्य , मशिनरी यांचेवर घसारा आकारणी करणे, घसारा रक्कम घसारा निधीत विहीत मुदतीत जमा करणे अइत्यादी विषयी बैठकीत चर्चा करण्यात आली.

५) १५ वा वित्त आयोगा अंतर्गत एकत्रित आर्थिक व भौतिक अहवालावर संनियंत्रण - ग्रामपंचायत स्तरावरील दफ्तर व कामांची नियमित तपासणी करून अडचणींचे निराकरण करणे, लोकसहभाग, प्रक्रिया नियोजन, संनियंत्रण इत्यादी तसेच पंचायत विभागाकडे वित्तीय वर्षाच्या अखेरीस असलेला अखर्चित निधी, १४ व्या व १५ व्या वित्त आयोगाचा अखर्चित निधी यावर बैठकीदरम्यान सविस्तर चर्चा केली.

वित्तीय वर्षा अखेर पंचायत विभागाकडे ग्रामपंचायतींची प्रलंबित अफरातफर प्रकरणे, सदर प्रकरणी संबंधित सरपंच, सचिव व संबंधित कर्मचारी यांचेवर नियमानुसार विभागाने केलेली कार्यवाही विषयी चर्चा केली.

ग्रामपंचायत स्तरावर प्रदान करतांना शासन कपाती होत नसल्याने शासना महसूलाची हानी होते म्हणून वित्तप्रेषण देतांना ग्रामपंचायत स्तरावर कपाती न करता पंचायत समिती स्तरावर वैधानिक कपाती कराव्यात याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. ग्रामपंचायतींमार्फत जिल्हा परिषदेच्या शाळांना/इमारतींना Taxes लावणे याविषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ग्रामपंचायतीच्या प्रशासकांनी मानधन घेतलेबाबतच्या आक्षेपांविषयी सहाय्यक संचालक यांनी बैठकीत आपले अभिप्राय नमूद केले.

६) आरोग्य विभागात खरेदी प्रक्रियेत उल्लंघन झाल्याचे मागील लेखापरीक्षणात निदर्शनास आल्याचे सहाय्यक संचालक यांनी सांगितले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र मधील मागणी व पुरवठा यांचा ताळमेळ होत नसलेबाबत सहाय्यक संचालक यांनी विभाग प्रमुखांचे लक्ष वेधले.

वैद्यकीय प्रतिपूर्ती मिळण्याच्या प्रमाणपत्रासाठी बिलाच्या ३ टक्के रक्कम कपात करून आरोग्य विभागाकडे जमा करणेच्या कार्यवाहीबाबत तसेच आरोग्य विभागाकडील थकीत अग्रिमाबाबत विभाग प्रमुखांसोबत चर्चा करण्यात आली.

लेखापरीक्षणाचा सुरू होण्याचा व संपण्याच्या कालावधीची माहिती मिळण्यासाठी लेखापरीक्षणाचे संभाव्य वेळापत्रक देणेबाबत मा. सहसंचालक यांनी निर्देश दिले.

वरीलप्रमाणे नमूद मुद्दयांवर चर्चा करण्यात आली असून लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देऊन लेखापरीक्षणाास योग्य ते सहाकार्य करणेबाबत सहमती दर्शवून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी बैठकीचा समारोप केला.

वरील चर्चेनंतर सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, म. रा. नागपूर यांनी उपस्थि सर्वांचे अभार व्यक्त करुन सदर बैठक संपल्याचे जाहीर केले.

(मोना कृ ठाकुर)
सहसंचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नागपूर विभाग, नागपूर

प्रतिलिपी : मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा. म. रा. मुंबई यांना माहितीस्तव.